12-02-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 02/11/2025 11:51 PM Page 1



सारझोरा स्टेशनला रहिवाशांचा तीव्र विरोध
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



टीम इंडिया व्हाईटवॉश देण्यासाठी सज्ज
पान ४ वर

वेर्णा, बुधवार, १२ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 160 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 12 February 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### जम्मूत स्फोटात दोन जवान शहीद

श्रीनगर, दि. ११ :
जम्मू-काश्मीरमधील नियंत्रण रेषेजवळ झालेल्या आयईडी स्फोटात दोन जवान शहीद झाले. तर एक जवान गंभीर जखमी असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. मंगळवारी दुपारी साडेतीन वाजता जम्मू जिल्ह्यातील खोर पोलिस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या केरी बट्टल परिसरात नियंत्रण रेषेजवळ आयईडी स्फोट झाला. यामध्ये तीन सैनिक जखमी झाले, ज्यांना लष्कराच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. यापैकी दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर एकाची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.
अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अखनूर सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ लष्कराचे पथक गस्त घालत होते. यावेळी दहशतवाद्यांनी आयईडी स्फोट घडवून आणला. त्यात तीन सैनिक जखमी झाले. माहिती मिळताच, अतिरिक्त लष्करी तुकडी घटनास्थळी पोहोचली आणि जखमी सैनिकांना रुग्णालयात नेल्यानंतर दहशतवाद्यांचा शोध घेण्यास सुरुवात करण्यात आली. स्फोटाच्या एक दिवस आधी सोमवारी राजौरी जिल्ह्यात नियंत्रण रेषेवर दुपारी नियंत्रण रेषेपलीकडून गोळीबार झाला.

------------

### अमेरिकेत जेट विमानांची धडक

वॉशिंग्टन, दि. ११ :
अमेरिकेतील विमान दुर्घटनांचे सत्र सुरू आहे. एरिजोना स्कॉट्सडेल विमानतळावर दोन जेट विमानांची धडक झाल्याने अपघात घडला आहे. या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून काही जण जखमी झाले. सोमवारी दुपारी ही दुर्घटना घडली. बिझनेस जेट धावपट्टीवरून घसरले आणि एका खासगी जागेवर उभ्या असलेल्या बिझनेस जेटवर धडकल्याने ही दुर्घटना घडली असल्याचे स्कॉट्सडेल विमानतळाच्या एव्हिएशन प्लॅनिंग आणि आउटरीच कोऑर्डिनेटर केली कुएस्टर यांनी सांगितले. फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशन (ऋ) नुसार, जे विमान पार्क केले होते ते पार्किंग क्षेत्रात होते. स्कॉट्सडेल अग्निशमन विभागाचे कॅप्टन डेव्ह फोलिओ म्हणाले की, जखमींपैकी दोघांना ट्रॉमा सेंटरमध्ये नेण्यात आले असून एकाची प्रकृती स्थिर आहे. स्कॉट्सडेल विमानतळावरील धावपट्टी बंद करण्यात आल्याचे कुएस्टर यांनी सांगितले. फिनिक्स परिसरातून ये-जा करणाऱ्या खाजगी विमानांसाठी हे विमानतळ एक महत्त्वाचे केंद्र आहे.

------------

### व्हॉट्सॲपवरून पाणी, वीज बिल भरता येणार

नवी दिल्ली, दि. ११ :
व्हॉट्सॲप युजर्ससाठी महत्त्वाचे अपडेट आहे. व्हॉट्सॲपमध्ये लवकरच नवे फीचर जोडले जाणार आहे. या फीचरमुळे युजर्सला पाणी, वीज, गॅस आदी बिले भरता येणार आहेत. नोव्हेंबर २०२० मध्ये व्हॉट्सॲपने देशात यूपीआयने पैसे पाठवण्याचा आणि प्राप्त करण्याचा पर्याय सुरू केला होता. अलीकडे एनपीसीआयने मेटा मालकीच्या प्लॅटफॉर्मसाठी यूपीआय ऑनबोर्डिंग मर्यादा हटवली. ही मर्यादा १० कोटी युजर्सपर्यंत होती. मात्र ती आता हटवण्यात आली. त्यामुळे सर्व युजर्ससाठी आपल्या पेमेंट्सचा विस्तार करण्याची परवानगी मिळाली आहे. डिजिटल पेमेंटमध्ये व्हॉट्सॲपला तगडी स्पर्धा असेल.

**हवामान**
कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

**बाजार भाव**

| | |
|---|---|
| सोने | ₹ ८७,७७० (१० ग्रॅम) |
| चांदी | ₹ ९९,५०० (१ किलो) |

**शेअर मार्केट**

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७६,२९३ .६० ↑ | (१०१८.२०) |
| निफ्टी | २३,०७१.८० ↑ | (३०९.८०) |

# ३५ टक्के इलेक्ट्रिक बसेसमध्ये आवश्यक सुविधा नाहीत!

## कदंबच्या ई - बसेसमध्ये महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी राखीव जागा नाहीत

टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ११ : गोव्याच्या स्मार्ट सिटी मिशनच्या अंतर्गत राज्याच्या राजधानीत सुरू करण्यात आलेल्या १६ इलेक्ट्रिक बसेसमध्ये महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव जागा नसल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे.**

केटीसीएल (कदंब ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन लिमिटेड) अधिकाऱ्यांनी ही त्रुटी मान्य केली आहे. कदंब महामंडळाचे विभागीय वाहतूक अधिकारी रॉक लुईस यांनी दिलेल्या माहितीनुसार, आम्ही या प्रकरणाची तपासणी केली आहे आणि असे लक्षात आले आहे की या १६ बसेसमध्ये महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी राखीव जागा नाहीत. आम्ही संबंधित कंपनीला ही बाब कळवलेली आहे आणि लवकरच या बसेसमध्ये राखीव जागा उपलबद्ध करून देण्याचा निर्णय घेतला जाईल

हेराल्ड मीडियाच्या प्रतिनिधींनी याबाबत या बसेसमध्ये प्रवास करणाऱ्या नागरिकांशी संवाद साधला आणि त्यांना प्रश्न विचारले की, जर या बसेस सरकारी निधी आणि करदात्यांच्या पैशावर चालवल्या जात असतील, तर अशा श्रेणीतील व्यक्तींसाठी राखीव जागा का नाहीत?

याबाबत गोवा राज्य अपंगत्व सल्लागार मंडळाचे सदस्य व ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कामत म्हणाले की, सार्वजनिक बसेसमध्ये महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव जागा असायला हव्यात. हे एक सामान्य धोरण असावे, अपवाद नसावा. या बसेसचा वापर खूप कमी आहे, त्यामुळे त्याचा सुसंगत वापर केला पाहिजे. दिव्यांग व्यक्तींना या बसेसमध्ये स्थान नाकारण्याचा प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही.

कामत पुढे म्हणाले, दिव्यांग व्यक्तींसाठी, ईव्ही बसेसमध्ये स्मार्ट कार्ड स्वीकारले जाणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने जे 'यूडीआयडी' कार्ड जारी केले आहे, तेच त्यांना वापरण्याची परवानगी दिली पाहिजे,



फोटो : उपेंद्र नाईक

यामुळे प्रवास करताना अतिरिक्त अडचणी निर्माण होणार नाहीत.

कार्यकर्त्या सिसिल रॉड्रिग्ज यांनीही यावर टिप्पणी केली. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी राखीव जागा असायला हव्यात. अन्यथा, बस गजबजल्यावर, महिलांना किंवा ज्येष्ठ नागरिकांना उभे राहावे लागते. याचे निराकरण झाले पाहिजे.

अपंग हक्क संघटनेचे गोवा अध्यक्ष अवेलिनो डीसा म्हणाले की, स्मार्ट कार्डची तरतूद असली तरी, ज्यांच्याकडे ती नाहीत, त्यांच्यासाठी एक पर्यायी उपाय असावा. बस चालकांवर रॅम्पचा योग्य वापर करण्याची जबाबदारी असावी, कारण दिव्यांग व्यक्तींना मदतीची आवश्यकता असते.

केटीसीएलने ४८ ई-बस सुरू केल्या असून, त्यापैकी काही बसेस गेल्या वर्षी लॉन्च करण्यात आल्या होत्या. यामध्ये २२ बसेस इमॅजिन पणजी म( स्मार्ट सिटी ) फंडिंगद्वारे, तर बाकीच्या २६ बसेस ऋ६० प्रकल्पांतर्गत केंद्र सरकारच्या निधीतून खरेदी झाल्या आहेत. यावेळी, इमॅजिन पणजी आणि केटीसीएलने पणजीमध्ये इलेक्ट्रिक बसेससाठी स्मार्ट ट्रान्झिट कार्ड व ' टयूमॉक ' ॲप लॉन्च केले होते, ज्याद्वारे प्रवासी ' कयूआर ' कोड प्रणालीद्वारे तिकीट बुक करू शकतात.

# आप -कॉंग्रेस नेत्यांत खटके सुरुच

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ११ :** आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपचा पराभव करण्यासाठी विरोधी पक्षांनी एकत्र येणे गरजेचे आहे, असा ठाम विश्वास बाणावलीचे आम आदमी पक्षाचे (आप) आमदार वेंझी व्हिएगस यांनी व्यक्त केला आहे. तसेच, दिल्लीतील 'आप'च्या पराभवाचा गोव्याच्या राजकीय समीकरणांवर फारसा परिणाम होणार नसल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना व्हिएगस यांनी सांगितले की, कॉंग्रेसचे दक्षिण गोव्याचे खासदार कॅप्टन विरियातो फर्नांडिस यांचा विजय हा 'आप'च्या योगदानामुळे शक्य झाला आहे आणि हे कोणीही नाकारू शकत नाही. लोकसभा निवडणुकीदरम्यान 'आप' आणि आघाडीतील अन्य घटक पक्षांनी केलेल्या मेहनतीमुळे हा विजय साधता आला. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये कॉंग्रेसकडूनही 'आप'ला पाठिंबा मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सध्या विरोधी पक्षांमध्ये असलेल्या फटी आणि मतभेद पाहता, येणाऱ्या निवडणुकीत युतीशिवाय भाजपला रोखणे कठीण असल्याचे व्हिएगस यांनी स्पष्ट केले. दिल्ली आणि इतर राज्यांतील निवडणुकांमध्ये युतीतील विसंवादामुळे भाजपला विजय मिळाला, याकडे त्यांनी लक्ष वेधले. भाजपने धर्म, सांप्रदायिकता आणि द्वेषाचे राजकारण खेळून विजय मिळवला आहे. विरोधकांनी यापासून धडा घ्यायला हवा, असे ते म्हणाले. व्हिएगस यांच्या मते, सध्या गोव्यात भाजपविरोधात उभे राहील, असा एकही पक्ष स्वतंत्रपणे मजबूत नाही. जर विरोधी पक्षांमध्ये एकसंघ नेतृत्व तयार झाले नाही, तर भाजपला पर्याय उरणार नाही. त्यामुळे सर्व विरोधी पक्षांनी एकत्र यावे, हीच योग्य रणनीती ठरेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

'इंडिया' आघाडी तुटल्यास त्याचा थेट फायदा भाजपलाच होईल, असा इशाराही त्यांनी दिला. दिल्लीतील पराभवाविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरुद्ध खोटे खटले दाखल करून त्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे आप'चे तत्वज्ञान आणि ओळख कमी झालेली नाही. 'आप'ने संपूर्ण देशात राजकारणाचा दर्जा उंचावला असून गोव्यातही वेळ्ळी आणि बाणावली या मतदारसंघांमध्ये आपला प्रभाव वाढवत आहे. पुढील निवडणुकीत भाजपला कडवी टक्कर देण्यासाठी पक्ष संघटन बळकट करण्यावर भर देणार असल्याचे व्हिएगस यांनी स्पष्ट केले.

### युतीवर टांगती तलवार

गोवा कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष सुनील कवठणकर यांनी युती संदर्भात मोठे वक्तव्य करत, समान विचारसरणीच्या पक्षांशी युती करण्याचा निर्णय हायकमांड घेईल, मात्र स्थानिक पातळीवर त्यावर चर्चा होत नाही. २०२२ च्या गोवा विधानसभा निवडणुकीच्या निकालावर विश्लेषण केल्यास, भाजपाने ३५ टक्के मते मिळवून सत्ता काबीज केली, तर विरोधी पक्षांनी ६५ टक्के मते मिळवली. अनेक विधानसभा जागा कमी फरकाने गमावल्या होत्या. अशा परिस्थितीत राजकीय पक्षांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे, असे सांगितले. कवठणकर पुढे म्हणाले की, भाजप ज्या पद्धतीने निवडणुका लढत आहे, त्यावरून राजकीय पक्षांनी एक मोठे चित्र पाहून एकत्र काम करणे गरजेचे आहे. निवडणूकपूर्व युती आणि जागावाटप मुख्यत: हायकमांड ठरवते आणि स्थानिक नेत्यांना विश्वासात घेऊनच अंतिम निर्णय घेतला जातो, असे ते म्हणाले.दक्षिण गोवा जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष सॅव्हियो डिसिल्वा यांनी 'आप' पक्षावर कडवट टीका केली. त्यांनी सांगितले, आपचे नेते राहुल गांधींवर भ्रष्टाचाराचे आरोप करत असताना, त्यांच्याशी युती करणे कसे योग्य ठरेल? भाजपला पराभूत करण्यासाठी युती केली जाऊ शकते, मात्र साष्टी तालुक्यात, जो कॉंग्रेसचा परंपरागत बालेकिल्ला आहे, तिथे युती कधीच होणार नाही. 'आप'चे प्रदेशाध्यक्ष ॲडव्होकेट अमित पालेकर यांनी बाणावली ब्लॉक कॉंग्रेस कमिटीच्या वक्तव्याला उत्तर देताना स्पष्ट केले की, युतीबाबतचे निर्णय कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि एआयसीसी गोवा डेस्क इंचार्ज यांचे असावे. बाणावली ब्लॉक कॉंग्रेसच्या नेत्यांना युती नको असण्याचे विधान अनुशासनहीनआहे. कॉंग्रेसला पाठिंबा देण्याच्या ऐतिहासिक उदाहरणांवरून युतीचं महत्त्व अधिक स्पष्ट होतो.

# घाऊक मासळी मार्केटच्या नियमांना पारंपरिक मच्छीमारांचा तीव्र आक्षेप

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ११ :** गोव्यातील नव्याने विकसित करण्यात आलेला आधुनिक घाऊक मासळी बाजार लवकरच कार्यान्वित होणार असला तरी, पारंपरिक मासेमार समुदायांमध्ये चिंता वाढली आहे. त्यांना भीती आहे की बाजारातील नियम आणि वेळेच्या निर्बंधांमुळे त्यांचे उपजीविकेचे साधन संकटात येऊ शकते.

सर्व सोयींनी सुसज्ज असलेल्या या बाजारपेठेमध्ये कॉंक्रीट प्लॅटफॉर्म उभारण्यात आले आहेत, जे विद्यमान बाजारातील अस्वच्छतेला आळा घालण्यासाठी तयार करण्यात आले आहेत. मात्र, या नव्या व्यवस्थेने अनेक भागधारकांमधील दीर्घकाळ प्रलंबित तणाव पुन्हा एकदा समोर आणला आहे.

रापणकार, मागकार आणि कांटकार यांसारख्या स्थानिक पारंपरिक मच्छीमारांना या बाजारपेठेत प्रवेश मिळेल का याबद्दल मोठी अनिश्चितता आहे. समुद्र ठरावीक वेळेनुसार चालत नाही, असे अनेक दशकांचा अनुभव असलेल्या मच्छीमारांनी सांगितले. आमच्या बोटी कधी किनाऱ्यावर परततील याची निश्चितता नसते. त्यामुळे बाजारपेठेने आमच्या पारंपरिक मासेमारी पद्धतींना सामावून घ्यायला हवे अशी या पारंपरिक मच्छीमारांची मागणी आहे च्छीमार समुदायाच्या समस्यांसोबतच स्थलांतरित किरकोळ विक्रेत्यांचे भवितव्यही अनिश्चित बनले आहे. हे विक्रेते घाऊक बाजारातील मोठ्या प्रमाणातील मासे खरेदी करून किरकोळ विक्री करतात, आणि दक्षिण गोवा नियोजन व विकास प्राधिकरणासाठी (एसजीपीडीए ) प्रवेश शुल्क (सोपो) च्या माध्यमातून महत्त्वाचा महसूल निर्माण करतात

सूत्रांच्या माहितीनुसार, या स्थलांतरित विक्रेत्यांनी गेल्या काही वर्षांतएसजीपीडीए आणि संबंधित प्रशासनाला मोठ्या प्रमाणात महसूल मिळवून दिला आहे. त्यामुळे त्यांना नवीन बाजार व्यवस्थेमध्ये स्थान मिळणार का? हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. मडगावमधील काही स्थानीय मासे विक्रेते बाजारपेठेच्या बाहेर, विशेषतः सार्वजनिक रस्त्यालगतच्या जागांवर व्यवसाय करतात. त्यांनी माजी मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांच्या काळात परवानगी मिळाल्याचा दावा केला आहे. त्यामुळे एसजीपीडीए व्यवस्थापनाने त्यांचे काय करायचे?हा आणखी एक कळीचा मुद्दा बनला आहे.

एसजीपीडीएच्या नव्या नेतृत्वासमोर ही परिस्थिती तणाव निर्माण करणारी ठरत आहे. प्राधिकरणाच्या सध्याच्या अध्यक्षपदी वास्कोचे आमदार कृष्णा साळकर आहेत, तर मडगावचे आमदार दिगंबर कामत आणि फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई हे मंडळाचे प्रमुख सदस्य आहेत. एसजीपीडीए प्रशासनाने बाजारपेठ केवळ घाऊक विक्रेत्यांसाठी मर्यादित ठेवायची का? की पारंपरिक मच्छीमार आणि स्थलांतरित विक्रेत्यांसाठीही लवचिकता द्यायची? हा मोठा निर्णय घेण्याची वेळ आता आली आहे.

स्थलांतरित विक्रेते आणि मोठे व्यापारी बहुतेकदा सीमेपलीकडून मोठ्या प्रमाणात मासळी आयात करून विकतात. याउलट पारंपरिक मच्छीमार थेट समुद्रातून ताजी मासळी आणून ग्राहकांपर्यंत पोहोचवतात, याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. आम्ही व्यापाऱ्यांसारखे बाहेरून मासे आयात करत नाही. आमची गरज आणि कार्यपद्धती वेगळी आहे, त्यामुळे बाजारपेठेने आम्हाला वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे,असे स्थानिक मच्छीमारांनी स्पष्ट केले. बाजारपेठ लवकरच सुरू होणार असताना,एसजीपीडीए प्रशासनावर विविध भागधारकांच्या मागण्या पूर्ण करण्याचा मोठा दबाव आहे. हा निर्णय फक्त विक्रेत्यांवरच नाही, तर गोव्यातील पारंपरिक मच्छीमार समुदायाच्या भविष्यावर आणि संपूर्ण मासळी वितरण व्यवस्थेवर परिणाम करणारा ठरणार आहे. प्रशासनाने घाऊक बाजाराचे स्वरूप कायम राखायचे की, पारंपरिक मच्छीमार आणि स्थलांतरित विक्रेत्यांनाही सामावून घ्यायचे?याचा ताळमेळ साधण्याचे आव्हान स्वीकारावे लागेल. एसजीपीडीए चा अंतिम निर्णय लवकरच अपेक्षित आहे.

# कुंकळ्ळीमध्ये प्रदूषणामुळे गंभीर आजारांनी रहिवाशांना घेरले!

## श्वसनाचे विकार, त्वचेच्या ऍलर्जी, दम्याचा त्रास, क्षयरोगाचे वाढते प्रमाण

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ११ :** कुंकळ्ळी औद्योगिक वसाहतीलगतच्या परिसरातील नागरिकांना श्वसनाचे विकार, त्वचेच्या ऍलर्जी , दम्याचा त्रास, मूत्रपिंडाचे आजार, कर्करोग यासारखे गंभीर आजार असल्याचे आरोग्य सर्वेक्षणातून पुढे आले आहे. इतकेच नाही तर या परिसरातील रहिवाशांमध्ये क्षयरोगाचे प्रमाण वाढत असल्याचा निष्कर्ष या सर्वेक्षणातून समोर आला आहे. बाळ्ळी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या (पीएचसी) अहवालात समोर आलेल्या या धक्कादायक निष्कर्षांनंतर, कुंकळ्ळीचे आमदार आणि विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांना पत्र लिहून कुंकळ्ळीमधील आरोग्य आणि पर्यावरणीय समस्यांचे सखोल मूल्यमापन करण्याची मागणी केली आहे.

बाळ्ळी पीएचसीने कुंकळ्ळी औद्योगिक वसाहतीलगतच्या परिसरातील ४४९ घरांचे सर्वेक्षण केले असून, औद्योगिक प्रदूषणामुळे अनेक स्थानिक



नागरिक विविध गंभीर आजारांना सामोरे जात असल्याचे समोर आले आहे.

आरोग्य केंद्राच्या अहवालानुसार, २८ लोकांना श्वसनाचे विकार, २९ जणांना त्वचेच्या ऍलर्जीचा त्रास, ११ जणांना दमा, ८ जणांना सायनसचा त्रास, तर काहींना क्षयरोग, सोरायसिस आणि मूत्रपिंडाचे आजार आहेत. एका व्यक्तीला क्रॉनिक ऑबस्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज असल्याचे निदान झाले आहे.

या अहवालावर प्रतिक्रिया देताना आलेमाव म्हणाले की, कुंकळ्ळी औद्योगिक वसाहतीतील वाढत्या प्रदूषणामुळे स्थानिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. जल आणि वायू प्रदूषणाच्या गंभीर समस्यांमुळे लोकांना श्वसनाचे आणि त्वचेसंबंधी त्रास होत आहेत. हे गंभीर प्रकरण असून, यावर तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.विरोधी पक्षनेत्यांनी या गंभीर समस्येचा मुद्दा नुकत्याच झालेल्या विधानसभा अधिवेशनात शून्य प्रहरात उपस्थित केला होता. आरोग्यमंत्र्यांनी कुंकळ्ळी नगरपालिका क्षेत्राचे सर्वेक्षण करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर आलेमाव यांनी लेखी स्वरूपात पत्र पाठवून सरकारला व्यापक आरोग्य मूल्यमापन करण्याची विनंती केली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून कुंकळ्ळीमधील नागरिक औद्योगिक वसाहतीतील प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांविरोधात आंदोलन करत आहेत. विशेषतः मासे प्रक्रिया युनिट्स आणि स्टील उत्पादन युनिट्समुळे होत असलेल्या जल व वायू प्रदूषणावर त्यांनी
आक्षेप घेतला आहे. या पार्श्वभूमीवर, युरी आलेमाव यांनी पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचे तातडीने मूल्यमापन करून योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे. कुंकळ्ळीमधील नागरिकांची आरोग्य सुरक्षा लक्षात घेता, हा विषय गांभीर्याने हाताळण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# सोन्याच्या दरवाढीने भारतीय बाजारपेठेत चिंता, गुंतवणूकदारांसाठी संधी

**नवी दिल्ली, दि. ११:** सोन्याच्या किमतीत झालेली अभूतपूर्व वाढ भारतात मोठ्या प्रमाणावर चर्चा आणि चिंतेचा विषय ठरली आहे. बुधवारी २४ कॅरेटच्या १० ग्रॅम सोन्याचा भाव रू. ८८,००० पर्यंत पोहोचला, जो विक्रमी उच्चांक आहे. या किमतीमुळे काही गुंतवणूकदारांना संधी दिसत असली तरी, अनेक मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी सोनं आता विशेषतः सध्या सुरू असलेल्या लग्नसराईच्या हंगामात न परवडणाऱ्या लक्झरीमध्ये बदलले आहे .

सोन्याच्या किमतीत झालेली तीव्र वाढ हंगामी चढउतार न करता, विविध आर्थिक आणि भू-राजकीय घटकांचा परिणाम आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) ने २०२४ मध्ये ७२.६ टन सोने खरेदी केलं, ज्यामुळे तिचा एकूण सोन्याचा साठा ८७६.१८ टन झाला आहे. यामुळे आरबीआयच्या मालमत्तेच्या पोर्टफोलिओत विविधता आणण्यासाठी सोन्याचा साठा वाढवण्यात आला आहे, असे अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी स्पष्ट केले.

जागतिक पातळीवर देखील मध्यवर्ती बँका सोन्याचे साठे वाढवत आहेत. २०२४ च्या मध्यापर्यंत, जगभरातील मध्यवर्ती बँकांनी एकूण १,०३७ टन सोने खरेदी केलं आहे. विशेषतः, पश्चिम आशियातील संघर्ष आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे अनेक



देश सुरक्षित आश्रयस्थान म्हणून सोन्याकडे वळत आहेत. याव्यतिरिक्त, अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया कमजोर झाल्यामुळे सोन्याची आयात महाग झाली आहे, ज्यामुळे भारतात सोन्याच्या किमतींमध्ये वाढ झाली आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील सोन्याच्या किमतींवर परिणाम करणारे घटक आहेत. अमेरिकेतील ट्रम्प प्रशासनाने चीन, मेक्सिको आणि कॅनडावरील करांमुळे महागाईला चालना दिली आहे, ज्यामुळे अमेरिकेतील गुंतवणूकदार संरक्षण म्हणून सोन्याकडे वळले आहेत. ट्रम्प प्रशासनाच्या धोरणांमुळे जागतिक बाजारपेठेतील अनिश्चितता वाढली आहे, जे सोन्याच्या किमतींमध्ये चढ-उतार करीत आहे. यासोबतच, अमेरिकेतील डॉलर निर्देशांकाने अलीकडेच १०९ पॉइंटचा टप्पा ओलांडला आहे, ज्यामुळे सोन्याच्या किमतींवर आणखी दबाव निर्माण झाला आहे. सोन्याला सामान्यतः महागाई आणि चलन घसरणीपासून बचावाचे साधन मानले जाते. शेअर बाजारातील अस्थिरता आणि आर्थिक अनिश्चितता असलेल्या काळात, गुंतवणूकदार संरक्षण म्हणून सोने खरेदी करण्याचा निर्णय घेतात. अलीकडच्या काळात, जागतिक तणावामुळे गुंतवणूकदार सावध झाले असून, सोन्याच्या किमतीत वाढ झाली आहे.

भारतातील मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी परिस्थिती गंभीर बनली आहे. लग्नसराईच्या हंगामात, ज्यामध्ये सामान्यतः सोन्याच्या खरेदीत वाढ होणारी असते, आता कुटुंबे खरेदी कमी करत आहेत किंवा ती पुढे ढकलत आहेत. त्यामुळे, दागिन्यांच्या उद्योगाला ताण आलेला आहे. दागिन्यांच्या विक्रीत घट होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या या उद्योगाला धोका आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, हंगामी वाढीमुळे आगामी काही महिन्यांत सोन्याची मागणी १०% पर्यंत वाढू शकते, परंतु ही मागणी प्रामुख्याने श्रीमंत वर्गापुरती मर्यादित असू शकते. अनेक मध्यमवर्गीय ग्राहक हलक्या दागिन्यांवर समाधान मानत आहेत किंवा दुसऱ्या गुंतवणूक पर्यायांचा शोध घेत आहेत. यामुळे, ज्वेलर्सला त्यांच्या विक्रीत घट होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे त्यांचा व्यवसाय कमी होऊ शकतो. सोन्याच्या किमतींमध्ये वाढ झाल्यामुळे, भारतातील दागिन्यांच्या उद्योगावर तीव्र परिणाम होण्याची शक्यता आहे. विशेषतः मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी, ज्यांचे सोन्याच्या खरेदीवर मोठे खर्च होतात, या परिस्थितीचा प्रतिकूल परिणाम होईल. उद्योग तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, हंगामी वाढीमुळे सोन्याच्या मागणीमध्ये १०% पर्यंत वाढ होऊ शकते, पण ती अधिक श्रीमंत आणि उच्च वर्गातील खरेदीदारांपुरती मर्यादित असेल.